आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
९ फेब्रुवारी २०२६ -सोमवार

**ठळक बातम्या**

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातल्या आजच्या नवव्या दिवशी लोकसभेचं कामकाज गदारोळामुळे आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर २ वाजेपर्यंत तहकूब

- लोकसभेत सभापतींविरोधात अविश्वासाचा ठराव मांडण्याचा विरोधकांचा निर्णय

- परीक्षा पे चर्चा च्या नवव्या आवृत्तीच्या दुसऱ्या भागात प्रधानमंत्र्यांचा देशभरातल्या विद्यार्थ्यांशी संवाद

- महाराष्ट्रात जिल्हा परिषद पंचायत समित्यांच्या निवडणुकांची मतमोजणी सुरू, सुरवातीच्या कलानुसार भाजपा आणि महायुतीतले पक्ष आघाडीवर

**आणि**

- संतोष करंडक फुटबॉल स्पर्धेचं विजेतेपद आठव्यांदा सेनादलांच्या संघाकडे

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातल्या आजच्या नवव्या दिवशी लोकसभेचं कामकाज गदारोळामुळे आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर २ वाजेपर्यंत तहकूब करावं लागलं. लोकसभेत बेशिस्त वर्तन केल्याबद्दल निलंबित झालेल्या ८ सदस्यांनी आज संसदभवन परिसरात निदर्शनं केली. त्यांच्या निलंबनाच्या मुद्द्यावरुन तसंच विरोधी पक्ष नेता राहुल गांधी यांना बोलण्याची संधी द्यावी या मागणीवरुन विरोधी पक्ष सदस्यांनी आज लोकसभेत प्रचंड गदारोळ केला. सभागृहाचा मान राखण्याचं आवाहन सभापती ओम बिरला यांनी वारंवार केलं. मात्र तरीही घोषणाबाजी थांबली नाही, त्यामुळे कामकाज तहकूब करावं लागलं.

लोकसभेत सभापती ओम बिरला यांच्या विरोधात अविश्वासाचा प्रस्ताव विरोधक आणणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं.

युवा क्रिकेट विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाचं अभिनंदन आज संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे करण्यात आलं. लोकसभेत सभापती ओम बिरला आणि राज्यसभेत अध्यक्ष सी पी राधाकृष्णन यांनी या संघाचं कौतुक केलं.

राज्यसभेत केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा सुरु आहे.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
९ फेब्रुवारी २०२६ -सोमवार

**<><><><><>**

लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या आभार प्रस्तावावर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना बोलू न दिल्याबद्दल लोकसभा सभापती ओम बिर्ला यांना पदावरून हटवण्यासाठी विरोधकांनी ठराव मांडण्याचा निर्णय घेतला आहे. संविधानाच्या कलम ९४ क अन्वये हा ठराव मांडण्यात येणार आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या दालनात आज झालेल्या विरोधी पक्ष सदस्यांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला द्रमुक, सपा, राजद, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, तृणमूल काँग्रेस या पक्षांसह इतर विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते. आभार प्रस्तावावर विरोधी पक्षनेत्यांना सभागृहात बोलू न देणं, भाजप खासदार निशिकांत दुबे यांच्यावर कारवाई न करणं आणि काँग्रेसच्या महिला खासदारांवर निराधार आरोप केल्याबद्दल बिर्ला यांच्या विरोधात हा ठराव मांडण्यात येईल.

**<><><><><>**

लोकसभेतल्या गदारोळाला काँग्रेस जबबाबदार असल्याचा आरोप कंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केलाहे. संसद भवन परिसरात ते वार्ताहरांशी बोलत होते. ते म्हणाले की, कांग्रेस खासदारांच्या बेशिस्त वर्तनामुळे राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरची चर्चाही सभागृहात पूर्ण होऊ शकली नाही. अर्थसंकल्पावरच्या चर्चेत सदस्यांना बोलण्याची संधी मिळाली नाही, आणि आवाजी मतदानाने अर्थसंकल्प मंजूर करावा लागला तर त्याला काँग्रेस जबाबदार असेल आणि त्याने त्यांचंही नुकसानच होईल, असं रिजिजू म्हणाले.

**..... होल्ड- बाईट- रिजिजू**

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सेशेल्ससाठी 107 डॉलर्सची मदत जाहीर केली आहे. भारत आणि सेशेल्स दरम्यान आज अनेक सामंजस्य करार झाले. सेशेल्सचे राष्ट्राध्यक्ष पॅट्रिक हार्मिनी यांच्याशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची आज नवी दिल्लीत चर्चा झाली. त्यानंतर संयुक्त संबोधनात भारत सेशेल्स संबध फक्त राजकीय नाहीत अस सांगत प्रधानमंत्र्यांनी भारत सेशेल्स संबध नव्या पर्वात प्रवेश करत आहे, असं नमूद केलं.

त्याआधी परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी हार्मिनी यांची नवी दिल्लीत भेट घेतली. हार्मिनी यांनी आज राजघाटावर जाऊन महात्मा गांधींच्या समाधीवर पुष्पांजली वाहिली.

भारत आपली आर्थिक समृद्धी आणि सुरक्षा यांचा विस्तार महासागर या उपक्रमातून करत असताना सेशेल्स सारखे सागरी शेजारी महत्वाचे आहेत असं जयशंकर यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी 'परीक्षा पे चर्चा'२०२६ च्या नवव्या आवृत्तीच्या दुसऱ्या भागात देशभरातल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दहावी, बारावीच्या परीक्षा जवळ येत असल्यानं, परीक्षेचा ताण, परीक्षेची तयारी, वेळ व्यवस्थापन तसंच विद्यार्थ्यांनी या परीक्षांना आत्मविश्वासानं कसं सामोरं जावं यावर या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा केली. लहान स्टार्टअपच्या माध्यमातून उद्योगाची सुरुवात, विविध छंद जोपासणे अशा अनेक बाबींवर प्रधानमंत्री बोलले. तंत्रज्ञानाची भीती बाळगू नका तसंच त्याच्या आहारीही जाऊ नका, असं त्यांनी कृत्रिम बुद्धीमत्तेसंदर्भातल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. तंत्रज्ञान हा एक उत्तम शिक्षक आहे, असं सांगत प्रधानमंत्र्यांनी ज्ञानार्जन, संशोधन आणि विकास यासाठी तंत्रज्ञानाचा हुशारीनं वापर करायची सूचना विद्यार्थ्यांना केली.

'परीक्षा पे चर्चा' हा कार्यक्रम यावर्षी देवमोगरा, कोईम्बतूर, राजपूर, गुवाहाटी आणि दिल्लीचा ७, लोककल्याण मार्ग या ठिकाणी झाला. साडे चार कोटी विद्यार्थ्यांनी या उपक्रमासाठी मायगव्हच्या माध्यमातून नोंदणी केली होती अशी माहिती केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने दिली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठीच्या मतमोजणीला सकाळी दहा वाजता सुरुवात झाली. सुरवातीच्या कलानुसार भाजपा आणि महायुतीतले घटक पक्ष आघाडीवर आहेत. भाजपा २६, काँग्रेस, १०, शिवसेना १३, राष्ट्रवादी काँग्रेस १३ आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार सहा जागांवर आघाडीवर आहेत.

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांसाठी ७ फेब्रुवारीला मतदान झालं. जिल्हा परिषदेच्या २ हजार ६२४ आणि पंचायत समितीच्या ४ हजार ८१४ उमेदवारांचं भवितव्य आजच्या निकालातून ठरणार आहे.

या निवडणुकीत एकूण सरासरी ६८ पूर्णांक २८ शतांश टक्के मतदान झाल्याचं राज्य निवडणूक आयोगानं कळवलं आहे.

दरम्यान, लातूर महानगरपालिकेच्या महापौरपदी जयश्री सोनकांबळे आणि उप महापौरपदी स्नेहल उटगे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

<><><><><>

भाजपा प्रणित राष्ट्रीय अनुसूचित जाती आघाडीचे अध्यक्ष परमजीत सिंग कैन्त यांनी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना भारतरत्न देण्याच्या आर एस एस सरसंघचालक मोहन भागवत यांच्या मागणीचं समर्थन केलं आहे. सावरकर हे हिंदू धर्मियांमधे फूट पाडणाऱ्या पुराणमतवादी रुढींच्या विरोधात होते, आंतरजातीय विवाहाला बंदी, सहभोजनाला बंदी आणि अस्पृश्यतेसह इतर रुढींना त्यांनी सात बेड्या म्हटलं आहे, असं कैन्त म्हणाले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना मरणोपरान्त भारतरत्न देण्यात आला, त्यामुळे सावरकरांनाही भारतरत्ननं सन्मानित केलं तर भारताची एकता ही समान हक्क आणि समान सहभागावर आधारित आहे हा संदेश लोकांपर्यंत पोहोचेल, असंही कैन्त म्हणाले.

<><><><><>

जैवविविधतेचे जतन तसंच जैविक संसाधनांचा वापर करणाऱ्यांना लाभाचा हिस्सा देण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून पर्यावरण, वने आणि हवामानबदल खात्याच्या अंतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरणाने ४५ लाखांचा निधी वितरीत केला आहे. महाराष्ट्रासह दहा राज्यांची जैवविविधता मंडळं तसंच दोन केंद्रशासित प्रदेशांमधल्या जैवविविधता कौन्सिल्सना हा निधी मिळाला आहे. ही जैवविविधता व्यवस्थापन मंडळं ग्रामीण भाग, स्थानिक मंडळं, खारफुटींचे भाग तसंच औद्यागिक क्षेत्रातही आहेत.

<><><><><>

समाजमाध्यम क्षेत्रातल्या मेटा आणि तिच्या अधिपत्याखालच्या वॉट्सअप या कंपन्यांच्या याचिकांची सुनावणी आता सर्वोच्च न्यायालयाने २३ फेब्रुवारीपर्यंत पुढे ढकलली आहे. ग्राहकांची माहिती परस्परांमध्ये सामायिक करण्यावरुन भारतीय स्पर्धा आयोगाने या कंपन्यांना  २ अब्ज १३ कोटी १४ लाख रुपये दंड ठोठावला होता. त्यानंतर स्पर्धा आयोगाने जाहिरातीसाठी वॉट्सअपला मेटासोबत माहिती सामायिक करण्यासाठी घातलेली बंदी उठवली पण दंड कायम ठेवला होता.

<><><><><>

पंजाब पोलीसांनी अमृतसर परिसरामध्ये सीमेवर शस्त्रे आणि अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या पाच जणांना आज अटक केली आहे. अशी माहिती पंजाबचे पोलीस महा संचालक गौरव यादव यांनी दिली आहे.

<><><><><>

अमेरिका आणि दक्षिण कोरियाच्या हवाई दलांनी प्योंगटेक इथल्या ओसान हवाई तळावर संयुक्त सराव सुरू केला आहे. हा सराव शुक्रवापर्यंत चालेल. दोन्ही राष्ट्रांच्या क्षमतांचा विस्तार करणं हा या सरावाचा हेतू आहे. या सरावाद्वारे हवेतून हवेत मारा करण्याची रणनिती सामायिक केली जाईल तसंच एकात्मिक रणनितीक प्रशिक्षण आयोजित केलं जाईल.

<><><><><>

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत, काल कोलंबोत झालेल्या ‘ब’ गटाच्या सामन्यात श्रीलंका संघाने आयर्लंड संघावर 20 धावांनी मात केली. मुंबईत ‘क’ गटात खेळल्या गेलेल्या सामन्यात इंग्लंड संघाने नेपाळला चार धावांनी पराभूत केलं. तर, चेन्नईत झालेल्या ‘ड’ गटाच्या सामन्यात न्यूझीलंड संघाने अफगाणिस्तान संघाचा चार गडी राखून पराभव केला.

<><><><><>

७९व्या राष्ट्रीय संतोष करंडक फुटबॉल स्पर्धेचं विजेतेपद  सेनादलांच्या संघाने पटकावलं आहे. आसाममधे ढाकूआखाना मैदानावर काल झालेल्या अंतिम सामन्यात सेनादलांच्या संघाने केरळवर १ – ० अशी मात केली. सेवादलाने आठव्यांदा हे अजिंक्यपद पटकावलं आहे.

//<><><><><>//